# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये नागपूर महानगरपालिकाद्वारा शहर तीन तारांकित मानांकन (३ Star Rating ) घोषित करण्याकरीता आवश्यक सर्व निकषांची अमलंबजावणी होत असल्याने नागपूर महानगरपालिका, नागपूर शहर तीन तारांकित मानांकन (३ Star Rating ) दर्जाचे शहर म्हणुन स्वंघोषित करण्यात आलेले आहे. केंद्रिय मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नागरीकांकडून प्रथमता जाहिरात क्रं. ४६९/ पी.आर. दि. ०८/१२/२०२२ नूसार स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिध्द करुन सुचना व हरकती मागविण्यात आलेले होते. या अंतर्गत ३ नागरिकांच्या सुचना/हरकती कार्यालयास प्राप्त झालेल्या असुन त्या पैकी २ हरकती या विषयाला अनुसरुन नाहीत व १ सुचना प्राप्त् असुन त्याला अमलात आणले जाईल. त्यानुसार नागपूर शहराला स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत ३ स्टार गुणवत्ते मध्ये नागपूर शहराचे नामांकन दाखल करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.
टिप :- सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 252/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 07/02/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये नागपूर महानगरपालिकाद्वारा शहर तीन तारांकित मानांकन (३ Star Rating ) घोषित करण्याकरीता आवश्यक सर्व निकषांची अमलंबजावणी होत असल्याने नागपूर महानगरपालिका, नागपूर शहर तीन तारांकित मानांकन (३ Star Rating ) दर्जाचे शहर म्हणुन स्वंघोषित करण्यात आलेले आहे. केंद्रिय मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नागरीकांकडून प्रथमता जाहिरात क्र. ४६९/ पी.आर. दि. ०८/१२/२०२२ नूसार स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिध्द करुन सुचना व हरकती मागविण्यात आलेले होते. या अंतर्गत ३ नागरिकांच्या सुचना/हरकती कार्यालयास प्राप्त झालेल्या असुन त्या पैकी २ हरकती या विषयाला अनुसरुन नाहीत व १ सुचना प्राप्त् असुन त्याला अमलात आणले जाईल. त्यानुसार नागपूर शहराला स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत ३ स्टार गुणवत्ते मध्ये नागपूर शहराचे नामांकन दाखल करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**